साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०२ डिसेंबर २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## महायुतीच्या नव्या सरकारचा येत्या गुरुवारी होणार शपथविधी

### पंतप्रधान नरेंद्र मोदी राहणार उपस्थित

मुंबई : (बातमीदार):- राज्यातील नव्या महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्याचा मुहूर्त अखेर ठरला असून येत्या गुरुवारी, ५ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबईत आझाद मैदानावर शपथविधी सोहळा होणार आहे अशी माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्याचे नवे मुख्यमंत्री कोण होणार? हे अद्याप अस्पष्ट असले तरी मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच विराजमान होणार, हे निश्चित मानले जात आहे. त्यासाठी येत्या ४ डिसेंबरला महायुतीच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली. या बैठकीला दिल्लीहून भाजपचे केंद्रीय निरिक्षक येणार असल्याचे माहिती मिळाली आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालात महायुतीला मिळालेल्या महाविजयाला आठवडा उलटला असला, तरी मुख्यमंत्रिपद कोणाकडे जाणार? आणि शपथविधी सोहळा कधी पार पडणार? याबाबत गेल्या कांही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. राजधानी दिल्लीत महायुतीच्या नेत्यांच्या बैठकावर बैठका होत आहेत.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष श्री बावनकुळे यांनी 'एक्स' या सोशल मीडियावर पोस्ट करत शपथविधी सोहळ्याचा अधिकृत मुहूर्त सांगितला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत येत्या गुरुवारी (दि.५) सायंकाळी ५ वाजता मुंबईतील आझाद मैदानावर राज्यातील महायुती सरकारचा शपथविधी सोहळा होणार असल्याचे श्री बावनकुळे यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

दरम्यान, गुरुवारी होणाऱ्या शपथविधीसाठी जय्यत तयारी सुरू झाली असून या शपथविधी सोहळयास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह गृहमंत्री अमित शहा तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातील इतर सदस्य, भाजपशासीत राज्याचे मुख्यमंत्री, भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत. यावेळी मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री हे पदाची शपथ घेतील अशी माहितीही मिळाली आहे. या शपथविधीसाठी राज्यातील महायुतीचे खासदार, आमदार, विधान परिषदेतील सदस्य, पक्षाचे पदाधिकारी, जिल्हा प्रमुख आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यासाठी सुरेक्षच्या दृष्टीने येणाऱ्या सर्वांना प्रवेशिका देण्यात येणार असल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, मुख्यमंत्रीपदाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, ज्येष्ठ नेते अमित शहा जो निर्णय घेतील तो मान्य असेल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. मंत्रिपदासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, रविंद्र चव्हाण, राधाकृष्ण विखे पाटील, मंगलप्रभात लोढा, अतुल सावे, आशिष शेलार, देवयाणी फरांदे, नितेश राणे, गोपीचंद पडळकर, संजय कुटे यांची नावे भाजपकडून चर्चीली जात आहे. बीड जिल्ह्यातून भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आमदार पंकजाताई मुंडे यांचे नाव आघाडीवर आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला दहा मंत्रिपदे व शिंदे यांच्या शिवसेनेला बारा मंत्रिपदे मिळणार असल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून मंत्रिपदासाठी बीड जिल्ह्याचे विद्यमान पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे नाव निश्चित झाले असल्याचेही सांगण्यात आले.

***

## 'इव्हीएम'बाबत शंका दूर करण्यासाठी काँग्रेसला निवडणूक आयोगाने दिले चर्चेचे निमंत्रण

मुंबई (वृत्तसंस्था):- महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत काँग्रेस व इतरांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने काँग्रेसला चर्चेसाठी निमंत्रण दिले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेससह महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला आहे. यानंतर काँग्रेसने ईव्हीएमच्या कार्यप्रणालीवर आक्षेप घेतला आहे. निकालामध्ये अनियमितता आणि सातत्याचा अभाव असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. आयोगाच्या वतीने मात्र महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतमोजणी पारदर्शीपणे पार पडल्याचा दावा केला आहे. काँग्रेसच्या आक्षेपांचे आणि शंकांचे निरसन करण्यासाठी आयोगाने या पक्षाला चर्चेसाठी बोलावले आहे.

या पक्षाच्या शिष्टमंडळासोबत ३ डिसेंबर रोजी चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती आयोगातील सूत्रांनी दिली. कायदेशीर बाबींची तपासणी करून काँग्रेसला लेखी उत्तर दिले जाणार असल्याचेही आयोगाने नमूद केले. मतमोजणीवेळी सायंकाळी पाच आणि अखेरच्या टक्केवारीत गडबड झाल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

यावर निवडणूक आयोगाने ही धोरणात्मक प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले आहे. मतमोजणीवेळी मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. दरम्यान, काँग्रेससह अन्य काही विरोधी पक्षांनी ईव्हीएम प्रणाली राबविण्याच्या प्रक्रियेवर आक्षेप घेतला होता. तसेच काही पराभूत उमेदवारांनी प्रशासनाकडे आक्षेप अर्ज दाखल करीत काही केंद्रावरील फेरपडताळणीसाठी पाहिजे ते शुल्कही भरले आहे. ***

## सारडगाव येथे श्री दत्तात्रय भगवान प्राणप्रतिष्ठा सोहळयानिमित्त दत्तयाग व कीर्तन महोत्सवाचे आयोजन

### शंकराचार्य श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यासह संत महंत राहणार उपस्थित

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग वैद्यनाथाच्या पावन पंचक्रोशीत निर्माण होत असलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम (अध्यात्मिक उन्नती केंद्र), गोपाळपुरा, सारडगांव, परळी-धर्मापुरी रोड, परळी वैजनाथ, जि. बीड येथे श्री दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व चार दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य दिव्य सोहळ्याला बद्रिनाथहून जगदुरू शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यासह संत महंत उपस्थित राहणार आहेत.

ह.भ.प. विद्यावाचस्पती डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज (निर्माणकर्ते श्री दत्तधाम, अध्यामिक उन्नती केंद्र) यांनी या सोहळ्याबाबत सविस्तर माहिती दिली.मार्गशीर्ष प्रतिपदा, सोमबार दि. २ डिसेंबर २०२४ ते मार्गशीर्ष शुक्ल विनायक चतुर्थी, गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ या चार दिवसीय कालावधीत हा अध्यात्मिक सोहळा होणार आहे.श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग होणार असुन यज्ञाचार्य: पूज्यनीय पं. राजराजेश्वर दीक्षित (ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग पुजारी, म.प्र.) हे असणार आहेत. 'परमाराध्य' परमधर्माधीश उत्तरामनाय ज्योतीष्पीठाधीश्वर जगदुरू शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती '१००८' (ज्योतिर्मठ, बद्रिनाथ, उत्तरांचल) यांच्या शुभहस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा तर कलशारोहण सोहळ्याला प.पू. महामंडलेश्वर स्वामी देवेंद्रानंदगिरी (अध्यक्षः वेदांत आश्रम, बहादूरगड, उपाध्यक्षः अखिल भारतीय संत्र समिती), ह.भ.प. मारोतीबाबा कुरेकर (माजी अध्यक्ष जोग महाराज वारकरी शिक्षम संस्था, आळंदी), प.पू. वेदांताचार्य विद्यावाचस्पती डॉ. माणिकशास्त्री मुखेकर (वाराणसी, आळंदी) उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास ना. धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे, राहुल कराड, भागवतराव कराड (माजी केंद्रीय अर्थ राजयमंत्री), मा.आ.चंद्रकांत सोनवणे, संजय दौड, बुधाजी पानसरे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या संपूर्ण सोहळ्यास विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथराव कराड यांची प्रेरणा असुन ह.भ.प.डॉ. नामदेवशास्त्री सानप महाराज हे आशिर्वादपर सदिच्छा भेट देणार आहेत. न.प.गटनेते वाल्मिकअण्णा कराड यांचे या सोहळ्यास विशेष सहकार्य लाभणार आहे. व्यवस्थापक समस्त ग्रामस्थ मंडळी, सारडगांव, नंदनज हे आहेत. ***



**परळी वैजनाथ :- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे येथील ज्येष्ठ युवक नेते राजेभाऊ फड यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महासचिव मुकुल वासनिक यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. या भेटीत त्यांनी अनेक राजकीय आणि सामाजिक विषयांवर चर्चा झाली.**

## बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी महोत्सवात सहभाग नोंदवावा-अरविंद विद्यागर

बीड, (जिमाका):- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ०४ ते ०५ डिसेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ ते २९ वयोगटातील जास्तीत जास्त युवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन संदर्भात समिती सदस्य, तज्ज्ञ, परीक्षक यांची बैठक शुक्रवारी (ता.२९) पार पडली. बैठकीस माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी अरुणा कोचुरे, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, तुकाराम पवार, गटशिक्षणाधिकारी श्री . तुरुकमाने आदींची उपस्थिती होती. बैठकीत शिक्षणाधिकारी श्री. शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर यांनी जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजना बाबत उपस्थितांना माहिती दिली.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना यावर आधारित स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, यात समूह लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम, या कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता लेखन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ७ हजार, द्वितीय ५ हजार, तर तृतीय ३ हजार रुपये देण्यात येणार आहेत. लोकगीत स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ५ हजार, द्वितीय ३ हजार, तर तृतीय २५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत. बैठकीस जिल्ह्यातील युवा क्षेत्रात काम करणारे दिनकर थोरात, प्रा. दीपक जमदाडे, प्रा.राम गव्हाणे, प्रा. सोपान सुरवसे, प्रा.केशव भागवत, प्रा.एस.एस.राऊत , प्रा.डॉ. रवींद्र काळे, व्ही. बी ठोंबरे, आर. एस. इंगळे आदींची उपस्थिती होती. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे यशस्वीतेसाठी क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गर्शक सतीश राठोड, रेवननाथ शेलार, अविनाश पाटील, धनेश करांडे, जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, राजेश बागलाने, मंगेश वडमारे आदी पुढाकार घेत आहेत. ***

## स्वाती मुंडे यांची आदर्श पोलीस पाटील सेवारत्न पुरस्कारासाठी निवड



परळी वैजनाथ (बातमीदार):- बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील दादाहारी वडगावच्या महिला पोलिस पाटील सौ. स्वाती रमेश मुंडे यांना जिल्हास्तरीय आदर्श पोलीस पाटील सेवारत्न पुरस्कारासाठी निवड झाली आहे. विविध मान्यवरांच्या हस्ते कोल्हापूर येथे ८ डिसेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण होईल अशी माहिती द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार सागर शेळके यांनी दिली. सौ. स्वाती रमेश मुंडे यांना जिल्हास्तरीय आदर्श पोलीसपाटील सेवारत्न पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

युवा ग्रामीण पत्रकार संघ कोल्हापूर जिल्हा आयोजित विशेष शानदार पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींचा, संस्थांचा पुरस्कार देऊन दिग्गज मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये कायदा सुव्यवस्था राखण्याबरोबरच गावातील महसूल व पोलीस प्रशासनाच्या जबाबदारी उत्तम प्रकारे सांभाळणे, जातीय सलोखा, सण, उत्सव, गावातील तंटे गावातच मिटवणे सह आदी प्रभावी कामे पार पाडल्यामुळे सौ.स्वाती रमेश मुंडे यांची जिल्हास्तरीय आदर्श पोलिस पाटील सेवारत्न पुरस्कारासाठी निवड जाहिर झाली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सागर शेळके , उपजिल्हाध्यक्ष डॉ राजेंद्र सूर्यवंशी, प्रा बाबूराव घुरके, अभिजीत पाटील, नारायण लोहार, गोरख कांबळे, मंगेश उबाळे , लखन तलवारे, पाडूंरग बेलेकर , हर्षद कुंभोज ,सुभाष भोसले, विजय मोरबाळे यांनी दिली आहे.

दादाहारी वडगाव येथील महिला पोलिस पाटील सौ.स्वाती रमेश मुंडे यांनी पोलिस, महसूल प्रशासन व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. दादाहारी वडगाव येथील गावाचा पोलिस पाटीलांचे कर्तव्य गेल्या १४ वर्षापासुन उत्कृष्टरीत्या सांभाळत आहेत. पोलिस पाटील सौ.स्वाती रमेश मुंडे यांना जिल्हास्तरीय आदर्श पोलीसपाटील सेवारत्न पुरस्कारासाठी निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईकांकडून स्वागत व अभिनंदन होत आहे. ***

## परळीत मराठी पत्रकार परिषद व उपजिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन

परळी-वैजनाथ (बातमीदार):- दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मराठी पत्रकार परिषद स्थापना दिनानिमित्त परळीत पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशाने मराठी पत्रकार परिषद शाखा परळी व उपजिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने दि.३ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न होत आहे. यात परळी शहर व तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी असे आवाहन मराठी पत्रकार परिषद शाखा परळी व उपजिल्हा रुग्णालय परळी यांनी केले आहे.

परळी येथील पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत परळी उपजिल्हा रुग्णालयातील अपघात विभागाच्या वरच्या मजल्यावर घेण्यात येणार आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभरात ३ डिसेंबरला दरवर्षी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येते. या शिबीरात पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबियांची आरोग्य तपासणी केली जाते. या वर्षी शिबीरामध्ये रक्तदाब, मधुमेह, डोळे, इसीजी, रक्ताच्या सर्व तपासण्या होणार आहे. तरी परळी शहर व तालुक्यातील सर्व पत्रकारांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान मराठी पत्रकार परिषद शाखा परळी व उपजिल्हा रुग्णालय परळी यांच्या वतीने करण्यात आले आहे. सर्वांनी या शिबीराचा लाभ घ्यावा ही विनंती. ***

**बचत विजेची समृद्धी राष्ट्राची !**

**सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!**
**-० अंकासाठी संपर्क ०-**
**मो.९४२२३२८४९३**

**थेंब थेंब पाण्याचा लाख लाख मोलाचा!**

# एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची मोलाची भूमिका

०१ डिसेंबर जागतिक एड्स दिन. या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये जिल्हा रूग्णालयाकडून विविध जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आपण सर्वांनी सहभागी होऊ या सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊया या दिनानिमित्त हा विशेष लेख

**''भला जन्म हा तुला लाभला खुलास -हदयी बुधा धरिसी तरी हरिचा सेवक सुधा''**

सुप्रसिद्ध लावणीकार, कवी राम जोशी मानवी नरदेहाबाबत वर्णन करताना ही लावणी गायलेली आहे. चौऱ्यांशी दशलक्षकोट्या योन्या फिरल्यानंतर मानवाला दुर्लभ असा नरदेह प्राप्त होतो. त्यामुळे त्याने या देहाचा उपयोग विधायक कार्यासाठी करणे आवश्यक आहे. परंतु आज वाढती व्यसनाधिनता नैतिक मुल्याचा ऱ्हास, तसेच सहजीवनाचा वाईट परिणाम देशातील लोकांवर मुख्यत्वे करुन युवकांवर पडत असलेला पहावयास मिळत आहे. त्याचा परिणाम देशाची भावी आधारस्तंभ असणारी तरुण पिढी ही एचआयव्ही संक्रमणाला बळी पडत असलेली पहावयास मिळते. मानवी भावना या नैसर्गिक असतात. परंतु या भावनांचा उद्रेक म्हणजेच विनाशास निमंत्रण असते. त्यामुळे त्यामध्ये सुवर्णमध्य साधणे आवश्यक असते.

**तारुण्याचे तीन 'त'कार''**

संयम हा मनुष्याच्या डोक्याचा आत्मा आहे, असे थोर विचावंत व तेजस्वी महापुरुष श्री स्वामी विवेकानंद यांनी सांगितले आहे. तसेच तेजस्वीतता, तपस्वीतता, तत्परता हे तारुण्याचे तील त कार आहेत. हे प्रत्यक तरुण-तरुणीमध्ये असले पाहिजेत. परंतु खरोखरच हे तिन्ही गुण आपल्या स्वतः मध्ये आहेत का ? या प्रश्नाचे आत्म संशोधन करण्याची आज वेळ आली आहे. कारण नैतिक शिक्षण आवश्यक झालेले आहे. त्यामुळे व्यक्तीला गतिमानता प्राप्त होण्यास मदत होईल. आजचा युवक व्यसनरूपी चक्रव्युव्हामध्ये अडकत आहे. ज्याचे पर्यावसन १५ ते ४९ या वयोगटातील लोकच आज जास्तीत जास्त व्यसनाधीन, एचआयव्ही बाधित पहावयास मिळताहेत.

एचआयव्ही संक्रमणाला बळी पडण्याचे महत्वाचे कारण हे या रोगाबद्दल असलेले अपुरे ज्ञान. तारुण्य अवस्थेतील जल्लोष आहे. त्यामुळे आजच्या युवांनी या आजाराबाबत प्रशिक्षित समुपदेशक, सल्लागार यांच्या मार्फत शास्त्रीय माहिती घेणे आवश्यक आहे. आयसीटीसी केंद्र यामध्ये (दिशा केंद्रामध्ये) येणाऱ्या सर्व व्यक्तींना एचआयव्ही, एड्स बाबत संपूर्ण शास्त्रीय माहिती दिली जाते. तसेच त्यांच्या संमतीनेच त्यांची एचआयव्ही चाचणी केली जाते. चाचणीपूर्व तपासणीमध्ये चाचणी नंतरच्या निष्कर्षाबाबत समोरील व्यक्तीला कल्पना दिली जाते. तपासणीबाबत पूर्णपणे गोपनीयता ठेवली जाते. चाचणी पश्चात समुपदेशनामध्ये समोरच्या व्यक्तीच्या मानसशास्त्रीय मुल्याचा अभ्यास करुन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन केले जाते.

''गळणाऱ्या पानांकडे नसते झाडाचे कधी लक्ष - नव्या पालवीलाच असते गोंजारण्यात ते दक्ष''

तात्पर्य, परिवर्तन हा काळाचा नियम आहे. या चराचर सृष्टीची निर्मिती ज्या निर्मिकाने उदात्त धोरणाने केली, तो उद्देश सफल करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. संस्कृतीचा वारसा आपण जोपासला पाहिजे. परंतु नवीन इंटरनेट, फेसबुक, व्हॉट्सअप च्या संस्कृतीमध्ये आपण आपली जुनी संस्कृती, नितीमुल्य पायदळी तुडवता कामा नये. वाढती फॅशन, अंगप्रदर्शन तसेच संयमहीन जीवन यामुळे आपण आपले अस्तित्वच विसरत चाललो आहोत. खऱ्या अर्थाने युवकांनी एड्समुक्त महाराष्ट्र, भारत स्वप्न नव्हे ध्येय, हे वाक्य खरे ठरवायचे असेल तर वरील सर्व बाबींचा सारासार विचार करायला हवा.

**''एकटे नाहीत तुम्ही - साथ आहोत आम्ही''**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. या कक्षांतर्गत विविध आयसीटीसी मार्फत युवकांसाठी एचआयव्ही, एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन, शिबिरे, चर्चासत्रे, परिसंवाद, पोस्टर प्रदर्शन इत्यादी उपक्रम, विविध स्पर्धांचे आयोजन वेगवेगळ्या लक्ष्यगटांमध्ये केले जाते.

यावर्षीचे जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य आहे ढगज्ञ ढहश ठळसहीं झरींह'' मार्ग हक्काचा, सन्मानाचा ! हे आहे. म्हणजेच एचआयव्ही संसर्गित लाभार्थ्यांना पण सर्व सामान्य नागरिकांसारखे हक्क आहेत, ते वेगळे नाहीत. त्यांना समाजामध्ये सम्मानाची व आदराची वागणूक दिली पाहिजे. सर्व कौटुंबिक सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, नव्हे तो त्यांचा हक्क आहे. यासाठी भारत सरकारने हक्काची जोपासणा करण्यासाठी एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७ अंमलात आणला आहे. ज्या कायद्याद्वारे एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना सम्मानपूर्वक वागणूक प्रदान करण्यात आली आहे. जर कोणी कलंकित करत असेल किंवा भेदभाव करत असेल, तर कायद्याने त्यांना शिक्षा देण्यात आली आहे. यावर्षीच्या घोषवाक्यानुसार एकटे नाहीत तुम्ही साथ आहोत आम्ही ही आम्हीपणाची भावना एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या लाभार्थ्यांच्या मनामध्ये विविध जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून वाढीस लावणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

चला तर मग आजच्या ०१ डिसेंबर या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये आपण सारेजन सहभागी होऊ या सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊया

एचआयव्हीबद्दल अधिक विस्तृत माहितीसाठी १०९७ टोल फ्री क्रमांकावर आपण माहिती विचारु शकता किंवा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, बीड येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा.

**- सुहास मनोहरराव कुलकर्णी**
(जिल्हा आयसीटीसी पर्यवेक्षक)
जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष,
जिल्हा रुग्णालय, बीड
मो.नं. ९४२००१७५३९

संपादकीय...

# हा संशय का...?

*** सुविचार ***

सत्य परेशान होता है, लेकीन पराजित नही.!

भारत हा लोकशाहीचा सर्वांत मोठा देश. लोकसंख्येत तर जगातील दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र. इथे सरकार निवडण्याचा अधिकार सर्वसामान्यांना, देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आहे. दर पाच वर्षाने देशात देशाचे व राज्यात राज्याचे सरकार निवडण्यासाठी सार्वत्रिक निवडणुका होतात. देशात अनेक वर्षे कागदी मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेतल्या गेल्या. मतदानांनंतर मतमोजणी करण्यासाठी कागदी मतपत्रिका मोजण्याचे काम मोठे त्रासदायक होते. शिवाय मोठा वेळ या मतपत्रिका मोजण्यासाठी जायचा. तसेच दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या लोकसंख्या व मतदारांच्या संख्येमुळे निवडणुकीत कागदी मतपत्रिका वापरणे खर्चिक होऊन बसले. त्यातच निवडणुकीतील उमेदवारांची संख्या वाढल्यास मतपत्रिका मोठी करावी लागे. त्यामुळे निवडणुकीच्या यंत्रणेवर पुन्हा आर्थिक ताण वाढू लागला. त्यामुळे १९८० च्या सुमारास केंद्रीय निवडणूक आयोगाने 'ईव्हीएम' म्हणजे 'इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन' हे मतदान यंत्र आणले. निवडणुकीत मतदानासाठी हे यंत्र वापरण्याबाबत विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधी, नेत्यांना प्रात्यक्षिकासह निवडणूक आयोगाने माहिती दिली. पुढे कितीतरी दिवस, महिने आणि वर्षे याबाबत चर्चा सुरू राहिली. अखेर सरकारने निवडणुकीतील मतदानासाठी 'इव्हीएम' मशीन वापरण्यास परवानगी दिली. १९८० पासून दोन हजार चार म्हणजे तब्बल चोवीस वर्षे हा प्रवास चालला. देशात २००४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत सर्वप्रथम मतदानासाठी या 'इव्हीएम' चा म्हणजे मतदान यंत्राचा वापर झाला. त्यावेळी या यंत्राचा वापर, हाताळणी, मतमोजणी, मतदान करणे याबाबत देशातील सर्वसामान्य नागरिकांसह मतदान प्रक्रियेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली. या यंत्राचे त्यावेळी देशभर स्वागत झाले. बदलत्या काळाबरोबर निवडणूक प्रक्रिया आधुनिक गतिमान करण्यासठी हा बदल आवश्यक असल्याचे मत सर्वसामान्यांसह जाणकार मांडू लागले.

मतदानाच्या प्रक्रियेत 'इव्हीएम' या मतदान यंत्राचा वापर सुरू झाल्याने निवडणुकीचा मोठा ताण कमी झाला. शिवाय प्रशासन व निवडणूक यंत्रणेचा मोठा वेळ वाचला, श्रम वाचले व पैसाही! कागदी मतप्रतिकेच्या वापरातील गैरप्रकारालाही आळा बसला. त्यामुळे निवडणुकीत 'इव्हीएम'चा वापर मतदानासाठी सुरू झाला.

या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातही गैरप्रकार केला जाऊ शकतो ती 'हॅक' केली जाऊ शकते. अशी ओरड सुरू झाली. निवडणूक आयोगाने दिल्लीत याबाबत प्रात्यक्षिक दाखऊन असा काही प्रकार करता येत नसल्याचे स्पष्ट केले. परंतु अनेक राजकीय पक्षाचे समाधान झाले नाही. या मतदान यंत्रावरील संशय वाढतच गेला. पुढे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने या यंत्राबाबत शंका उपस्थित केली नाही. पुढे मतदारांच्या समाधानासाठी मतदान यंत्रावर केलेले मतदान त्याच उमेदवाराला जाते की नाही हे समजण्यासाठी व मतदानाच्या प्रक्रियेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी मतदान यंत्राला म्हणजे 'इव्हीएम' ला 'व्हीव्हीपॅट' (व्होटर व्हेरीफाईड पेपर ऑडीट ट्रेल) ची सुविधा उपलब्न करुन देण्यात आली. या यंत्र सुविधेमुळे मतदानावेळी मतदाराने मतदान यंत्रावर आपल्या उमेदवाराच्या नावापुढील निवडणूक चिन्हाचे बटन दाबल्यावर आपण टाकलेले मत त्याच उमेदवाराला मिळाले का नाही याची खात्री पटते. २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर सर्वप्रथम केला गेला. उपलब्ध माहिती प्रमाणे आपल्याकडे मतदानासाठी वापरल्या जाणाऱ्या मशिन्स भारत इलेक्ट्रॉनिक्स व हिंदुस्थान लिव्हर लि. या कंपन्या बनवतात. जगातील १४ वर देशात भारतात तयार झालेल्या 'इव्हीएम' मशीनद्वारे तिथे मतदान घेतले जाते. हे यंत्र अत्यंत पारदर्शक आहे. यात कोणताही बदल वा बिघाड करता येत नाही. इंटरनेटशी याचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे 'हॅक' करता येत नाही. हे वारंवार सिद्ध केले गेले आहे.

मतदान यंत्र अत्यंत सुरक्षित आहे असे असतानाही कोणत्याही निवडणुकीनंतर इव्हीएम बाबत मोठी ओरड होताना दिसते. विशेष म्हणजे मतदानादिवशी रजिस्टरवरील मतदानाची नोंद व मशीनवरील मतदानाची नोंद तपासली जाते. सर्व प्रतिनिधीसमोर मतदान यंत्र सिल केले जाते. मतमोजणीच्या दिवशीही प्रतिनिधी व विविध अधिकाऱ्यांच्या, अनेक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मतदान यंत्राचे सील काढले जाते व मतमोजणी केली जाते. या सर्व गोष्टी संपूर्णपणे पारदर्शक असतात असे असूनही मतदान यंत्रावर शंका का उपस्थित होते हे एक कोडेच आहे.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर इव्हीएम मशीन बाबत मोठा संभ्रम निर्माण केला गेला आहे. या यंत्राबाबत मोठी ओरड सुरू झाली आहे. निवडणुकीतून हे यंत्र हद्दपार करुन पुन्हा मतप्रतिकेद्वारे मतदान घेण्याची मागणी केली जात आहे. यासाठी आंदोलन सुरू होत आहे. हे असे करणे म्हणजे विज्ञान युगातून जुन्य अश्मयुगात जाण्यासारखे आहे. मतदान यंत्रात खरेच गैरप्रकार होत असेल तर तो सिद्ध करुन दाखवण्याचे आव्हान संबंधितांनापुढे आहे. परंतु असे होत नाही. केवळ शंका आणि संशय घेऊन मतदान यंत्राला बदनाम केले जाते, असे आम्हाला वाटते. दरम्यान, मतदानादिवशी सायंकाळी मतदान झालेली मोठी वाढ, टपाली मतदान व यंत्राचे मतदान यांतील फरक, प्रत्यक्ष मतदान व मतदान यंत्रावरील वाढलेले मतदान याबाबत काही राजकीय पक्षाचे नेते मोठी ओरड व आरोप करत आहेत. मतमोजणी पुन्हा घेण्यासाठी काही पराभूत उमेदवार पुढे आले आहेत याबाबत काय होते व निवडणूक आयोग कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष आहे.**

# यशवंतरावांचे बोट महाराष्ट्राने सोडले म्हणून..?

महाराष्ट्राच्या लक्षात असेल का? बहुधा नसेलच...दिनांक २५ नोव्हेंबर रोजी यशवंतराव चव्हाण यांची ४० वी पुण्यतिथी झाली. ज्यांनी या महाराष्ट्राच्या 'बांधणी'ची सुरुवात केली. त्यांना महाराष्ट्र तर विसरलाच... त्यांच्या विचाराचे बोट धरून चाललेला महाराष्ट्र आज कुठेच दिसत नाही. त्यांचा विचारही कुठे दिसत नाही... महाराष्ट्राला त्या विचारांची आज गरज नाही, अशा अवस्थेत आपण आहोत. कारण निवडणुकीने हे सिद्ध केले आहे... पैशांचा खेळ ज्याला प्रभावीपणे करता येतो तो निवडणूक जिंकू शकतो.... लढवू शकतो... राज्य करू शकतो...
यशवंरावांच्या पहिल्या निवडणुकीचा खर्च त्यांनी लिहून ठेवला होता... तो खर्च होता १५६० रुपये एवढा 'प्रचंड' होता...
आता विधानसभा निवडणूक ५० कोटींच्या पुढे आहे... लोकसभा निवडणुकीत तर पोत्याने पैसे वाटले गेले. परवाच्या विधानसभा निवडणुकीतही काय धुमाकूळ झाला, ते आपण पाहिलेच.... भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीसावर किती कोटी रुपये वाटल्याचे आरोप झालेत... ते आरोप फेटाळले गेले... पण तावडे यांच्यासारख्या चांगल्या कार्यकर्त्याचे नाव यात का यावे? चांगली-चांगली माणसे सुद्धा राजकारणाने नासवली का? त्यामुळे यशवंतरावांच्या ४० व्या पुण्यतिथीदिनी मस्तक बधीर होण्याची वेळ आलीय.... आज राजकीय फोडाफोडी.... त्याच्याकरिता पैशांचा वापर.... निवडणुकीतील पैसा... याच्याबद्दल लाज, लज्जा... शरम वाटावी, असे आता काही राहिले नाही... पैसा वाटणाऱ्याला नाही... पैसा घेणाऱ्यालाही नाही... बातम्या छापणाऱ्यालाही नाही... वाचणाऱ्यालाही नाही. या सगळ्या दृष्टचक्रात महाराष्ट्र असा काही गुरफटला आहे.... की, राज्य कोणाच्या हातात चाललेय, याचा विचार करण्याची महाराष्ट्राची राजकीय कुवत संपली. अशाच निष्कर्षाला आता यावे लागेल.

यशवंतरावांच्या पुण्यतिथी दिनी काय आठवायचे आणि काय सांगायचे..? १९५७ सालच्या निवडणुकीत अटीतटीचे सामने झाले.... खुद्द यशवंतराव हे जेमतेम १००० मतांनी निवडून आले. केशवराव पवार पडले. द्विभाषिक राज्य होते म्हणून गुजरातच्या आमदारांच्या संख्याबळावर यशवंतराव मुख्यमंत्री होऊ शकले. पण सत्ताधारी आणि विरोधी पक्षामध्ये फक्त ९ आमदारांचे मताधिक्य होते. पण, संयुक्त



महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर आणि १९६२ सालापर्यंत आणि नंतरची दोन वर्षे यशवंतरावांचे ९ मताधिक्याचे सरकार शांतपणे चालले. विरोधी पक्षनेते उद्धवराव पाटील यांनी स्पष्टपणे सांगून टाकले की, 'आम्हाला आमदार फोडून सरकार बनवायचे नाही... मतदारांनी आम्हाला विरोधी बाकावर बसायला निर्णय दिलेला आहे...' कुठे त्यावेळचे राज्यकर्ते.... कुठे त्यावेळचे विरोधी पक्षनेते... विरोधी बाकावरील नेते... आणि आताचे राज्यकर्ते, विरोधी पक्षनेते! एकूणच सगळा प्रकार खरेदी-विक्रीचा होऊन बसलेला आहे... २०२४ च्या निवडणुकीत बहुमत मिळाले नाही तर पुन्हा खरेदी-विक्रीचा व्यवहार होणारच. महाराष्ट्र तो निमुटपणे पाहणार... यापूर्वी फाटा-फूट झाली नव्हती, असे नाही... पक्ष बदलले गेले नाही, असेही नाही... पण त्यात भामटेगिरी नव्हती. पैशांचा व्यवहार नव्हता... त्यावेळच्या निवडणुकांमध्ये फार सुसंस्कृतपणा होता. मला आठवणाऱ्या निवडणुका आता अशा आहेत की, कार्यकर्ते दुधात भिजवलेल्या दशम्या ( भाकरी) घेऊन, घरातील छकडा झुंपून प्रचाराला बाहेर पडायचे... आता नेत्यांच्या सवयी बिघडल्या... कार्यकर्ते त्याहून बिघडले. पूर्वीच्या आमदारांना एस. टी. मध्ये पहिल्या बाकावरील दोन जागा कायम राखीव होत्या. आणि सामान्य प्रवाशांसोबत आमदारही प्रवास करायचा. त्यावेळचे आमदार 'आमदार निवासात' रहायचे... आताचे ९० टक्के आमदार नागपूर अधिवेशनात आमदार निवासात राहात नाहीत. फाईव्ह स्टार, सेव्हन स्टार हॉटेलमध्ये राहतात. त्या प्रत्येकाच्या गाड्या म्हणजे अमेरिकेच्या अध्यक्षाच्या गाडीसारख्या... सगळेच काही विचित्र... न समजणारे... मतदाराचे ५ वर्षातील उत्पन्न किती वाढले, कसे वाढले? २०१४ ला जो आमदार उभा राहिला त्याचे २०१९ चे उत्पन्न बघा.... आणि २०२४ च्या उमेदवाराचे उत्पन्न बघा... १०० पटीने फरक झाला आहे. सामान्य मतदार हे विचारतच नाहीत की, 'हे एवढे पैसे आणि इस्टेट कशी झाली... कुठून मिळवलेत....? महाराष्ट्रात सगळ्यात वाईट काय घडत असेल तर या सगळ्या सडलेल्या राजकीय प्रवृत्तीबरोबर महाराष्ट्राचे प्रशासनही फार मोठ्या प्रमाणात सहभागी झालेले दिसते. यशवंतरावांसारख्यांना त्याच्या झिणझिण्या जाणवत अधिक जाणवत असतील.... किती साधी आणि कार्यक्षम व्यक्तिमत्त्वे होती प्रशासनात. आज तो दरारा, तो आवाका राहिलेला दिसत नाही. उलट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे पी. ए.ही निवडणुकीत उतरले आहेत. आणि राज्याच्या पोलीस महासंचालकाला काही आरोपांमुळे पदावरू हटवण्याची वेळ प्रशासनावर आली. एवढा प्रशासनाचा स्तर महाराष्ट्रात यापूर्वी कधी घसरला होता का?

राजकीय नेत्यांच्या वखवखलेपणाबरोबर प्रशासनालासुद्धा वाळवीने पोखरल्यासारखे

(उर्वरित पान ३ वर)

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

* वर्ष ०८ * अंक ३१ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०२ डिसेंबर २०२४ * किंमत : २ रू.

# शेतमालाच्या हमीभावाला कायदेशीर संरक्षण हवे-सुप्रीम कोर्ट

## न्यायालयाच्या निर्णयाचे किसान सभेकडून स्वागत

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शेती संकट व शेतकरी आत्महत्या यावर मार्ग काढण्यासाठी मा सुप्रीम कोर्टाने गठित केलेल्या समितीने शेतमालाच्या हमीभावाला कायद्याचे संरक्षण मिळणे जरुरीचे अशी शिफारस केली आहे. अखिल भारतीय किसान सभा व संयुक्त किसान मोर्चा यांच्या प्रदीर्घ संघर्षाला न्यायालयाच्या या निर्णयामुळे बळ मिळाले असून हमीभावाच्या कायदेशीर संरक्षणाबाबत सुप्रीम कोर्टाने या केलेल्या शिफारशीचे किसान सभेच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. उत्पादन खर्च लक्षात घेऊन उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव द्यावा ही शिफारस स्वामीनाथन आयोगानेही शेतकरी आत्महत्या रोखण्या संदर्भामध्ये केली होती मात्र त्याची अंमलबजावणी केंद्र वा राज्य सरकार कडून करण्यात आली नाही.शेती मालाला हमीभाव मिळावा यासाठी रस्त्यावरील आंदोलनासह न्यायालयीन लढाई सुरूच ठेवली होती.

याबाबत सुप्रीम कोर्टानेच शेतमालाच्या हमीभावासंदर्भात त्याला कायद्याचे संरक्षण मिळण्याची शिफारस केली आहे यामुळे शेतीच्या मूलभूत समस्येत सुधारणा होऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सुटण्याची आशा निर्माण झाली आहे. केंद्र सरकारने चालवलेली शेती हमीभाव योजना ही योजना असून कायदा नसल्याने त्यातून घोषित केलेला हमीभाव तेवढा मिळालाच पाहिजे असे कुठलेही कायदेशीर बंधन नसल्यामुळे सरकारने घोषित केलेला हमीभाव हमखासपणे शेतकऱ्यांच्या पदरात पडत नाही. वर्षभर वाट पाहून राब राब राबवून उत्पादित केलेला शेतमाल जर उत्पादन खर्चाच्याही खाली कमी किमतीत विकावा लागत असेल तर या नैराश्यातून शेतकरी आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे यातून मार्ग काढण्यासाठी शेतमालाच्या हमीभावाला कायदेशीर संरक्षणाची आवश्यकता होती प्रत्यक्ष बाजारभाव व घोषित हमीभाव यात तफावत निर्माण झाल्यास भावांतर योजनेतून ही तफावत भरून काढणे सरकारला बंधनकारक होईल व शेतकऱ्यांना घोषित हमीभाव पदरात पडेल व शेती संकट काही प्रमाणात कमी होईल अशी आशा यातून निर्माण झाली आहे.महागाई नियंत्रणात आणायची आहे तसेच व्यापारी वर्ग खुश करायचे आहे म्हणून सरकार हस्तक्षेप करते. आयात निर्यात धोरणातून शेतमालाचे भाव पाडते म्हणून भावांतर योजनेतून या लूटमारीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याचा मार्ग या हमीभावाच्या कायद्यातून होणार आहे.

एकीकडे खर्च लक्षात न घेता घोषित केलेला हमीभाव नवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रोत्साहनाचा अभाव खते, बियाणे यावरील घटत जाणारी सबसिडी आणि महागाई नियंत्रणाबाबत सरकारचा हस्तक्षेप यामुळे शेती अडचणीत येऊन शेतकरी आत्महत्या करत आहेत हमीभावाच्या कायद्याची आवश्यकता सर्वोच्च न्यायालयाने शिफारशीत केली आहे याचं किसान सभा स्वागत करते पण सोबतच घोषित केलेला हमीभाव देणे बंधनकारक होईल म्हणून केंद्र सरकार उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा असा हमीभाव घोषित करेल याच्याबद्दल शेतकरी लढा चालू ठेवून डाव्या चळवळींनी रोजगार हमी योजना अन्नसुरक्षा योजना या केवळ योजना न ठेवता त्याचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी यशस्वी लढा दिला अगदी त्याचप्रमाणे हमीभाव योजनेलाही कायद्याचे कवच मिळवून देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची ही शिफारस उपयोगी ठरावी अशी अपेक्षा अखिल भारतीय किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष कॉम्रेड ॲड.अजय बुरांडे यांनी आमच्या प्रतिनिधीस कळवले. ***

# मंदिर परिसरातील फाटकाचा विषय मुख्याधिकाऱ्याकडून दुर्लक्षित-ॲड.मनोज संकाये



परळी वैजनाथ (बातमीदार):- बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून परळीची ओळख आहे. याच परळीमध्ये मुख्याधिकाऱ्याचा मनमानी कारभार सुरू आहे. वारंवार निवेदने देऊन सुद्धा मंदिर परिसरातील फाटक बसवण्याची हिंमत मुख्याधिकारी साहेब दाखवतील का असा प्रश्न सामान्य परळीकरांना भेडसावत आहे. याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही लोकहिताच्या मागणीकडे दुर्लक्ष मुख्याधिकारी करत आहेत असा आरोप सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र मध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर लागण्यापूर्वी या विषयासंदर्भात निवेदने मित्र मंडळाच्या वतीने असंख्य युवकांच्या साक्षीने देण्यात आली. जिल्हाधिकारी साहेबांना सुद्धा निवेदने दिली आहेत तरीसुद्धा नगरपालिकेचे मुख्याधिकारी साहेब याकडे साप दुर्लक्ष करत आहेत. मंदिर परिसरातील दक्षिणमुखी गणपती मंदिर आणि नगरपालिके समोर या संदर्भात पाच फुटाचे खड्डे खंदले आहेत मात्र लोखंडी फाटक बसविण्याची कार्यवाही होताना दिसत नाही. या खड्ड्यांमध्ये लहान मुले आणि आबाल वृद्ध नागरिक पाडण्याची भीती आहे. परळीकरांमध्ये सुद्धा याबाबत सकारात्मक प्रतिसाद आहे. लोकहिताचे कामे करण्यासाठी लोक नगरपालिकेतील प्रतिनिधींना निवडून देतात मात्र एकही प्रतिनिधी या बाबतीमध्ये बोलण्यास तयार नाही याचा अर्थ त्यांना लोकहिताचे काही देणे घेणे नाही का असा प्रश्न सामान्य परळीकरांच्या मनामध्ये आहे. या रस्त्यावरून मोठी वाहतूक आहे जड वाहनांची वाहतूक यामुळे येथे कोंडी होते. या रोड वरून जीव मुठीत धरून नागरिकांना जावे लागते त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेसाठी लोखंडी फाटक बसवणे अत्यंत गरजेचे आहे या लोकहिताच्या मागणीचा गांभीर्यपूर्वक मुख्याधिकारी साहेबांनी विचार करावा आणि त्वरित कारवाई करून फाटक बसवण्याचे काम त्वरित सुरू करावे अन्यथा नगरपालिकेसमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे. ***

# परळी विधानसभा मतदारसंघात ११ पैकी ९ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त!

परळी वैजनाथ, (बातमीदार):- संपूर्ण राज्यात चर्चेचा ठरलेला परळी विधानसभा मतदारसंघ, हा मुंडे परिवाराचा बालेकिल्ला आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.या बालेकिल्ल्यात मुंडेंना चोहोबाजूंनी घेरण्याचे शर्तीचे प्रयत्न केल्यानंतरही परळी विधानसभा मतदारसंघाचा बालेकिल्ला ऐतिहासिक विजयाने सर करण्यात धनंजय मुंडे यांनी यश मिळवले आहे. या निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी मताधिक्य मिळविण्याचा इतिहास रचला आहे. त्यांनी १९४८८९ एवढी मते घेतली तर तब्बल एक लाख ४० हजार २२४ मतांचे मताधिक्य घेत विजयश्री खेचून आणली. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना ५४६६५ इतकी मते मिळाली.उर्वरित ११ पैकी ९ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २३३ -परळी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मतमोजनीची प्रक्रिया होवुन निवडणूकीचा निकाल दि.२३.११.२०२४ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. २३३- परळी विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये एकुण निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराची संख्या ११ होती. एकुण ११ उमेदवारास मिळालेल्या वैध मताची संख्या ही २५५६३८/- आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १५८ (४) नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास एकुण उमेदवाराच्या वैध मताच्या १/६( एक षष्ठांश) मते मिळणे आवश्यक आहे. वैध मतांची संख्या २५५६३८/असुन त्यांच्या १/६ एक षष्ठांश हा ४२६०६ मते इतका येतो. त्यामुळे संबंधित उमेदवार यांची अनामत रक्कम जप्त करणे आवश्यक ठरते. त्यामुळे ४२६०६ पेक्षा कमी मते मिळालेल्या ९ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त करण्यात येत असल्याची अधिकृत माहिती परळीचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली आहे. ***

**परळी मतदारसंघात 'या' नऊ उमेदवारांची अनामत जप्त**

१. धोंडीराम लक्ष्मण उजगरे, रा. शिवाजी नगर थर्मल रोड परळी वै ता. परळी वै.
२. केदारनाथ भागवत वैजनाथराव जाधव रा.जळगव्हाण ता. परळी वै जि. बीड
३. बबनराव वैध रा. कुमारनिवास बांगर नाला, गुजर कॉलनी नगर रोड बीड
४. साहस पंढरीनाथ आदोडे रा.संत नामदेव नगर बीड ता.जि.बीड
५. अल्ताफ खाजामियों सय्यद रा. जुने रेल्वे स्टेशन परळी वै ता. परळी वै.जि.बीड
६. दयानंद नारायण लांडगे रा. घाटनांदूर ता. अंबाजोगाई जि. बीड
७. राजेसाहेब उर्फ राजेभाऊ सुभाष देशमुख रा. सेलुअंबा ता. अंबाजोगाई जि.बीड
८. शाकेर अहमद शेख रा. पेठ मोहल्ला परळी वै ता.परळी वै जि. बीड
९. हिदायत सादेखअली सय्यद ४०८ रा. सायगाव ता.अंबाजोगाई जि. बीड

(पान २ वरुन).......**यशवंतरावांचे बोट महाराष्ट्राने सोडले म्हणून..?**

वाटत आहे. अशा या सगळ्या स्थितीत ४० वर्षांपूर्वी महाराष्ट्राची 'राजकीय आणि सामाजिक-सांस्कृतिक' घडी बसवण्याचा प्रयत्न केला. ते सगळे आठवले की, तो महाराष्ट्र काही वेगळाच होता...., असे सतत जाणवते.

१९६१ साली यशवंतरावांनी काँग्रेस कार्यकर्त्यांचे महाबळेश्वरला ३ दिवसांचे शिबीर घेतले. कार्यकर्ता तयार व्हायला १० वर्षे काम करावे लागते. तीन दिवसांत कार्यकर्त्यांची वैचारिक बैठक तयार झालेली मला त्या शिबिरात पाहता आली. यशवंतराव चव्हाण, वि. स. पागे, बाळासाहेब भारदे, विनायकराव पाटील, वसंतदादा या मंडळींनी कार्यकर्ता कसा घडतो, याचे वस्तुपाठ दिले. यशवंतरावांच्या भाषणात 'कृषी-औद्योगिक क्रांतिचा' संकल्प जाहीर झाला. मुंबई -पुण्याचे उद्योग ग्रामीण भागात उभे करण्याचा निर्णय झाला. आज आपण 'एम. आय. डी. सी...' म्हणतो त्याचा जन्म १९६१ सालचा आहे. ग्रामीण भागात लाखो रोजगार त्या विचारांतून निर्माण झाले. 'कुरुकुंभ', 'लोटे परशुराम', 'धाटाव', 'बुटीबोरी' अशा या आजच्या बहरलेल्या औद्योगिक वसाहती त्यांची संख्या आता शेकडोत आहेत. तो यशवंतरावांचा विचार होता. 'पंचायत-राज' हा यशवंतरावांचा विचार होता. 'माझा ग्रामीण कार्यकर्ता 'नेता' झाला पाहिजे, तो पंचायत समिती, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष झाला पाहिजे' हा विचार ६४ वर्षांपूर्वी मांडला गेला. आणि अंमलात आलाय... कधी? तर १९६१ च्या शिबीरानंतर.... १३ मार्च १९६२ ला देशातील पहिला जिल्हा परिषदेचा ग्रामीण भागातील अध्यक्ष महाराष्ट्रात पहिल्यांदा खुर्चीवर बसला. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला भावाची हमी त्या काळात दिली गेली. कृषी उत्पन्न बाजार समित्या झाल्या. सहकारी उद्योग, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, ग्रामीण भागात मोफत शिक्षण.... एक नव्हे असंख्य बाजूंनी यशवंतरावांनी महाराष्ट्राची बांधणी करायला सुरुवात केली. खाजगी गाड्यांचे राष्ट्रीयकरण झाले.... खेड्यापाड्यांत एस.टी. धावू लागली. ग्रामीण भागातील सर्व जातींची मुले शाळांमध्ये जाऊ लागली.... शिकू लागली.... तिकडे कर्मवीर भाऊरावांनी 'रयत'नावाने शिक्षणसंस्था उभी केली. पाच लाख विद्यार्थी आज त्या संस्थेत शिकत आहेत... १५००० प्राध्यापक आहेत. त्या संस्थेचे अध्यक्ष यशवंतराव होते. आज शरद पवारसाहेब आहेत. महाराष्ट्राच्या चौफेर बांधणीचा तो काळ होता. नंतरचे वसंतराव नाईक, वसंतदादा, बाळासाहेब देसाई, राजारामबापू, शरद पवार.... अगदी विलासरावपर्यंत.... नेतृत्वाने कर्तृत्वाची साक्ष दिली.

यशवंतरावांच्या आवाक्याची तर कल्पनाच करता येणार नाही. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्याबरोबरच एकीकडे कृषी औद्योगिक क्रांती.... दुसरीकडे साहित्य संस्कृती मंडळ.... राज्याच्या मुख्यमंत्र्याचे 'सांस्कृतिक भान' किती उंच असू शकते, त्याचा तो सगळ्यात मोठा निर्णय होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीसारखा विद्वान शोधून काढून यशवंतरावांनी शास्त्रीजींना त्याचे अध्यक्ष केले. शास्त्रीजींनी अफाट संशोधन आणि मेहनतीने विश्वकोषाचे १८ खंड तयार केले. आज महाराष्ट्रातील सरकारमधील आमदारांना याची कल्पनाही असणार नाही. छातीवर हात ठेवून सांगावे की, किती मंत्र्यांनी आणि किती आमदारांनी वाईच्या प्रज्ञापाठशाळेला भेट दिलीय...? माहिती घेतलेली आहे... अभ्यास केला आहे. काही मदत केली आहे... कसली संस्कृती आणि कसलं मंडळ... महाराष्ट्राची संस्कृती भलतीकडेच चालली आहे. पैशांच्या खेळाने संस्कृतीचा गळा घोटला आहे. एकूणच वातावरण आता 'पैशाशिवाय निवडणूक नाही' असे झालेले आहे. सवय-चटक सगळाच काही बदल झालेला आहे. त्यामुळे 'लोकशाहीतील निवडणूक' हा एक उपचार ठरेल... अशा अवस्थेत आपण आलेलो आहोत. महाराष्ट्राला त्याचा राग नाही... संताप नाही... चीड नाही... आणि मतदारांनाही आता त्याचे काही वाटेनासे झालेले आहे. निर्लज्जपणाच्या पलिकडे महाराष्ट्र गेला आहे... बरं झाले, यशवंतराव हे पहायला नाहीत... त्यांना त्यांचा महाराष्ट्र असा पहावलाच नसता.

महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे याकरिता पाच वर्षे लढा झाला. १०६ जणांनी आपले बलिदान दिले.... तेच कामगार-तेच शेतकरी पाच-पाच वर्षे लढ-लढ लढले.... ते सगळे नेते त्यात आचार्य अत्रे आहेत, सेनापती बापट आहेत... डांगे, एस. एम., उद्धवराव, गणपतराव, दादासाहेब गायकवाड, दादासाहेब रूपवते.... ते शाहीर अमर शेख, आत्माराम पाटील किती नावे घ्यावी... महाराष्ट्र राज्य निर्माण झाले... किती खस्ता खावून यशवंतराव आणि अनय नेत्यांनी महाराष्ट्राची बांधणी केली.

भारताची राज्यघटना लिहणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी 'भारतच्या राज्यघटनेविषयी' एक अत्यंत महत्वाचे भाषण केले होते.... आज त्यातील प्रत्येक शब्द खरा होतोय, असेच वाटते. ते म्हणाले होते, 'भारतात नवोदित झालेली लोकशाही आपले बाह्यांग व्यवस्थितपणे शाबूत ठेवू शकेल... परंतु ती व्यवहारात हुकूमशाहीला आपली जागा बळकवण्यास वाव देईल, असा प्रकार घडून येणे सर्वथैव शक्य आहे. स्वातंत्र्याच्या जोडीला समता नसेल तर ही लोकशाही मुठभर लोकांचीच सत्ता प्रस्थापित करू शकेल... ' आज डॉ. बाबासाहेबांचा प्रत्येक शब्द खरा ठरतो आहे. लोकशाही आहे... आणि तिला 'पैसाशाही'चा घेराव पडलेला आहे. त्यामुळे समता येणार कशी? आणि या विळख्यातून लोकशाहीची सुटका होणार कशी? त्यामुळे यशवंतरावांच्या पुण्यतिथीला त्यांचे बोट पकडून चालणारा तो महाराष्ट्र आज राहिलेला नाही. आणि पुन्हा तो निर्माण करण्याची कुवत असलेला नेता आता होणे नाही... इतक्या दुःखद निर्णयापर्यंत यावे लागते आहे. शांतपणे बसून जे होईल ते बघायचे.... यापेक्षा आपण अधिक काय करू शकणार आहोत....? ***

**- मधुकर भावे,**
जेष्ठ पत्रकार, मुंबई